सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

वृत्तपत्रात तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाशी संबंधित प्रसिध्द झालेल्या बातमी बाबत खुलासा

बातमी

तंत्रशिक्षण सहसंचालक, शासकीय अभियांत्रिकी प्राचार्यांची सुडबुध्दि
प्राधिकरणाचा निकाल विरोधात जाताच लिपिकाची आरंभली विभागीय चौकशी
०१ मे पासुन बेमुदत उपोषणास बसण्याचा जिल्हाधिका-यांना इशारा

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांचा खुलासा

श्री. श्रीकृष्ण माणिकराव बेलोरकर, सेवानिवृत्त कनिष्ठ लिपिक, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, अमरावती यांचे कडून आमरण उपोषणा बाबत या कार्यालयास नोटीस प्राप्त झालेली आहे. सदर नोटीस मध्ये श्री. बेलोरकर यांनी इतर अनुषंगीक मुद्दयांसह पेन्शन व इतर लाभ मिळणे बाबतचा मुद्दा नमुद केलेला आहे. त्यांचे कडून प्राप्त नोटीस मध्ये नमुद बाबींचे अवलोकन केले असता, प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती खालील प्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

१. श्री. बेलोरकर यांनी कालबध्द पदोन्नतीचा पहिला व दुसरा लाभ मिळणे बाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मुळ अर्ज क्र. ३९३/२०२२ दाखल केलेला होता. सदर मुळ अर्जा संदर्भात मा. न्यायालयाने दि. १५.०४.२०२४ रोजी आदेश निर्गमित केलेला होता.

२. परंतू श्री. बेलोरकर यांनी सदर लाभ मा. न्यायालया कडून प्राप्त करुन घेण्यासाठी मा. न्यायालयात सादर केलेल्या रिजॉईंडर मध्ये त्यांना माहिती अधिकारान्वये प्राप्त झालेली माहिती सादर न करता, गैरमार्गाने व अफरातफर करुन मिळविलेली माहिती मा. न्यायालयात रिजॉईंडर स्वरुपात सादर करुन मा. न्यायालयाची दिशाभुल केली व मा. न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिलेला आहे. उपरोक्त वस्तुस्थिती प्राथमिक चौकशी मध्ये निदर्शनास आल्या नंतर श्री. बेलोरकर यांचे विरुध्द प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, अमरावती यांचे शिफारशी नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली. सदर विभागीय चौकशीअंती श्री. बेलोरकर हे त्या मध्ये सबळ पुराव्यांचे आधारे दोषी आढळून आले आहेत.

३. श्री. बेलोरकर यांनी मा. न्यायालयाच्या निकालावर परिणाम होईल अशा प्रकारे मा. न्यायालयात खोटे कागदपत्रे सादर करून, मा. न्यायालयाची दिशाभुल केलेली आहे व हि बाब सबळ पुराव्यांचे आधारे सिध्द झालेली असुनही, प्रशासनावर समाज माध्यमांदवारे दबाव टाकून वेठीस धरण्याचा प्रयत्न करीत आहेत.

वृत्तपत्रात तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाशी संबंधित बातमीचा खुलासा उपरोक्त प्रमाणे करण्यात येत आहे.

(मनोज म. अंधारे)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती

5/1/25, 9:26 AM

IMG-20250425-WA0002.jpg



## तंत्रशिक्षण सहसंचालक, शासकीय अभियांत्रिकी प्राचार्याची सूडबुद्धी

# प्राधिकरणाचा निकाल विरोधात जाताच लिपिकाची आरंभली विभागीय चौकशी

### १ मेपासून बेमुदत उपोषणास बसण्याचा जिल्हाधिकाऱ्यांना इशारा

नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. २३ : येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातील कनिष्ठ लिपिकाला सेवाकाळात कालबद्ध पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ नाकारण्यात आल्याने संबंधित निवृत्त लिपिकाने महाराष्ट्र सेवा प्राधिकरणात दाद मागितली. प्राधिकरणाने त्याच्या बाजूने निर्णय दिल्याने व्यथित झालेल्या तंत्रशिक्षण सहसंचालक आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी संबंधित कनिष्ठ लिपिकाची विभागीय चौकशी सुरू केली. आता त्याविरोधात लिपिकाने १ मे पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून दिला आहे.

श्रीकृष्ण माणिकराव बेलोरकर, असे निवेदनकर्त्यांचे नाव असून ते गतवर्षी ३० सप्टेंबरला स्थानिक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून कनिष्ठ लिपिक या पदावरून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. सेवाकाळामध्ये त्यांना हेतुपुरस्सरपणे कालबध्द पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ नाकारण्यात आल्याने त्यांनी नाईलाजाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, नागपूर यांचेकडे दाद मागितली. न्यायालयीन प्रकरणाकरिता त्यांना काही कागदपत्राची आवश्यकता होती. ती त्यांनी माहिती अधिकारातर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे मागितली. ती कागदपत्रे व वरिष्ठ न्यायालयांनी दिलेल्या निकालांच्या पूर्वोदाहरणाच्या आधारे न्यायाधीकरणाने श्रीकृष्ण बेलोरकर यांच्या बाजूने निकाल दिला. त्यांना कालबध्द पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत आदेश निर्गमित केले.

न्यायालयीन प्रकरणामध्ये पराजय झाल्याने व्यथित होऊन तंत्रशिक्षण सहसंचालक आणि शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी संगनमत करून विभागीय चौकशी सुरु केली, असे श्रीकृष्ण बेलोरकर यांचे म्हणणे आहे. माहिती अधिकार कायद्याखाली माहिती मागण्याचा प्रत्येक भारतीयास अधिकार आहे, परंतु आपण मागितलेली माहिती ही अवैध मार्गाने मिळवली असा आरोप श्रीकृष्ण बेलोरकर यांच्यावर चौकशीत ठेवण्यात आला व चौकशीत दोषी आढळल्याचे दाखविण्यात आले. वास्तविक श्रीकृष्ण बेलोरकर यांना मिळालेली माहिती तत्कालीन माहिती अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने मिळाली होती. हे विशेष. श्रीकृष्ण बेलोरकर यांच्या विभागीय चौकशीवरील अहवाल अंतिम निर्णयाकरिता शासनाकडे पाठविण्यात आला असून तो गेल्या सात महिन्यांपासून निर्णयासाठी प्रलंबित आहे, असे बेलोरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

विभागीय चौकशीच्या कारणाखाली न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे देय असणारा आश्वासित प्रगतीचा व त्यानुषंगाने देय असलेल्या थकबाकीचा लाभही देण्यात आलेला नाही. हा न्यायालयीन आदेशांचा उघडपणे केलेला अवमान आहे. सेवापुस्तक पडताळणीकरिता पडताळणी पथकाकडे पाठविताना त्यासोबत जाणून बुजून न्यायालयीन निर्णयाची प्रत पाठविण्यात आली नाही, तसेच वेतन निश्चिती करताना त्यामध्येही त्रुटी ठेवण्यात आली. त्यामुळे आपल्या सेवापुस्तकाची पडताळणी होऊ शकलेली नाही, असेही बेलोरकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

आपल्या हक्काच्या शिल्लक रजांच्या रोखीकरणाची रक्कम देखील अद्याप मुद्दाम देण्यात आलेली नाही. विभागीय चौकशीचा रजा रोखीकरणाशी दूरान्वयानेही संबंध येत नाही, तरी सुध्दा रजा रोखीकरणाची रक्कम रोखण्यात आलेली आहे. सेवेत असताना अफरातफर केली असा आरोप करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून समाजात बदनामी देखील करण्यात येत असल्याचे बेलोरकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यावर कोणत्याही प्रकारची वसुली निघाल्यास ती वसुल करण्याकरिता शासनाने नियम विहित केलेले आहेत. त्या नियमांच्या अधीन राहूनच वसुली करणे आवश्यक आहे. अशा वसुलीकरिता नियमबाहयरित्या सेवानिवृत्ती वेतन रोखून कर्मचाऱ्यास त्रस्त करण्याचा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना अधिकार नाही. अशी रक्कम असल्यास उपदानामधून वसुल करण्याची तरतुद महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), १९८२ मध्ये आहे.

(उर्वरित वृत्त पान ६ वर)

https://mail.google.com/mail/u/1/#inbox/QgrcJHsBmtftzBkjLxNpvgRtvgbWVpwNLXL?projector=1&messagePartId=0.1

मरावती । गुरुवार, २४ एप्रिल २०२५ । ६

पान ८ वरून

# प्राधिकरणाचा निकाल विरोधात जाताच...

तसेच आपण यासाठी इन्डेम्नीटी बाँड भरुन देण्यास देखील तयार असल्याचे श्रीकृष्ण बेलोरकर यांनी प्राचार्यांना कळवून देखील हक्काचे लाभ देण्यात आलेले नाहीत, असे बेलोरकर यांनी निवेदनात म्हटले आहे.

आपली बायपास शस्त्रक्रिया झालेली आहे, त्यामुळे सतत औषधोपचार घ्यावा लागतो. एकुलत्या एक मुलीचे लग्न ठरले असून साखरपुडा देखील झालेला आहे. अशा परिस्थितीत वारंवार विनंती करुन देखील हक्काचे लाभ मिळाले नाहीत. पैशाअभावी स्वतःवर औषधोपचार करणे शक्य न झाल्यास आणि जीवाचे काही बरे-वाईट झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी तंत्रशिक्षण संचालक आणि प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती यांची राहील, असा इशारा श्रीकृष्ण बेलोरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनातून दिला आहे. या अन्यायाविरुध्द १ मेपासून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणार असल्याचे श्रीकृष्ण बेलोरकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदन वजा नोटीसमध्ये नमूद केले आहे.

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरणाच्या आदेशानुसार वेतन निश्चिती विशेष प्रयत्न करुन तातडीने करवून घ्यावी व नवीन वेतन निश्चितीप्रमाणे थकबाकी अदा करुन सेवानिवृत्ती वेतन प्रकरण ताबडतोब महालेखाकार यांचेकडे पाठविण्यात यावे, शिल्लक असलेल्या अर्जित रजांचे रोखीकरण तातडीने करण्यात यावे व ती रक्कम लवकरात लवकर देण्यात यावी, सूडबुध्दीने व कुहेतुने अत्यंत हास्यास्पद आरोप ठेवून केलेली विभागीय चौकशी तत्काळ रद्द करण्यात यावी, प्रलंबित सर्व रकमांवर व्याज देण्यात यावे, इत्यादी मागण्या श्रीकृष्ण बेलोरकर यांनी केल्या आहेत.